# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक २५ मार्च, २०१३.
## (सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत)

**(गुरुवार, दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव - चर्चा व मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री. विनोद तावडे**, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"महाराष्ट्रामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इत्यादी शहरात सोनसाखळी चोऱ्या, अपहरण, चोऱ्या, खून, दंगली, इत्यादींच्या प्रमाणात झालेली लक्षणीय वाढ, मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड हाफिज सईद याचे चिथावणीखोर व धार्मिक भावना भडकाविणाऱ्या भाषणाचे ध्वनिमुद्रण आणि दृकश्राव्य फितीचा मोबाईलद्वारे धुळे येथे मोठ्या प्रमाणात प्रसार करण्यात आल्याने दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी धुळे येथील मछली बाजार येथे दंगल उसळणे, या दंगलीत दंगेखोरांकडे तीक्ष्ण धारधार शस्त्रास्त्रे व विशिष्ट प्रकारचे ॲसिड सापडणे, आंध्र प्रदेश राज्यातील एम.आय.एम. या पक्षाचे लोकप्रतिनिधी अकबरुद्दीन ओवेसी यांनी नांदेड येथे केलेल्या प्रक्षोभक भाषणाप्रकरणी संबंधीत पोलीस स्थानकामार्फत अद्यापी कोणतीही कारवाई केलेली नसणे, एकूण गुन्हेगारीत वाढ झालेली असताना पोलीसांच्या व विधी व न्याय खात्याच्या संशयास्पद भूमिकेमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण गतवर्षी केवळ ९ टक्के असताना या वर्षी ते ९ टक्क्याच्याही खाली आलेले असणे, शिक्षा झालेले अनेक आरोपी पॅरोलच्या नियमांचे उल्लंघन करून फरार होवून गंभीर गुन्हे करीत असल्याचे निदर्शनास येणे, दिल्ली येथील निर्भया प्रकरण ताजे असताना मुंबईत भर अधिवेशन कालावधीत म्हणजेच दिनांक १५ मार्च, २०१३ व दिनांक १६ मार्च, २०१३ अनुक्रमे विलेपार्ले आणि माटुंगा येथे सामुहिक बलात्काराच्या घडलेल्या गंभीर घटना, भंडारा जिल्ह्यात तीन अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून त्यांचा खून करण्यात आल्याप्रकरणी गृह खात्याच्या व फॉरेन्सिक खात्याच्या तपासणी अहवालात नसलेली एकवाक्यता, राज्यात महिला, अल्पवयीन मुली, दलित व बालकांवरील अत्याचारात वाढ होवून यामध्ये पुरोगामी महाराष्ट्राने मागास राज्यांनाही मागे टाकणे, नवी मुंबईतील सुनिल लाहोरिया खून प्रकरण, संध्या सिंग खून

प्रकरण, सिडकोतील लिपिक श्री.अतुल म्हात्रे खून प्रकरणांसह अनेक गंभीर खून प्रकरणांचा तपास लावण्यास गृह खात्यास आलेले अपयश, डान्सबार बंद करण्याची घोषणा करुन देखील समाज शाखेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुंबई महानगरक्षेत्रात डान्सबार सुरु असणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत देखील वाढ झालेली असणे, मुंबई शहरातील खाजगी आस्थापनांवर तैनात असलेल्या २१ खाजगी सुरक्षारक्षकांकडून दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी बेकायदेशीर शस्त्रास्त्रांचा जप्त केलेला साठा, २६/११ च्या हल्ल्यानंतर सीसीटिव्ही यंत्रणा बसविण्याची घोषणा करुन देखील अद्यापपर्यंत सीसीटिव्ही यंत्रणा बसविलेली नसणे, एकूणच राम प्रधान समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत शासनाची असलेली उदासिन भूमिका, यासर्व बाबींमुळे पोलीस दलाबाबत संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

(अ) **तारांकित प्रश्न.**

(ब) **अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी व अकरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे-**

(१) **मुख्यमंत्री** : "शासन सेवेतील मागासवर्गीय अधिकारी पदांच्या नियुक्ती करताना आरक्षणामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत" या विषयावरील श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दिनांक १६ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या आश्वासनानुसार सभागृहासमोर माहिती ठेवतील.

(२) **गृह मंत्री** : "महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांचा दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

चार : **म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

पाच : **लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**सर्वश्री. चंद्रकांत पाटील,** नरेंद्र पाटील, विनोद तावडे, विनायकराव मेटे, भगवान साळुंखे, दिपकराव साळुंखे, हेमंत टकले, संदिप बाजोरिया, अनिल भोसले, प्रकाश बिनसाळे, जयवंतराव जाधव, विक्रम काळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा गेल्या ३ वर्षांपासून प्रलंबित असलेला निर्णय, मराठा समाजातील मुलांना चांगले गुण मिळूनही इंजिनियरिंग, मेडिकल, आयआयटीसारख्या क्षेत्रात उच्च शिक्षणाची दारे बंद होणे, सद्य:स्थितीत एकूण ५२ टक्के आरक्षण अनुसूचित जाती-जमाती, भटक्या, इतर मागास, विशेष मागास आदी जातींना दिले असणे, मराठा समाजातील युवकांत बेकारीचे प्रमाणात वाढ होणे, राजर्षी शाहू महाराजांचा जाहीरनामा, ब्रिटीश शासन निर्णय, १९५५ सालचा कालेकर आयोग यांनी मराठा जातीचा समावेश ओबीसीमध्ये केला असणे, मात्र सद्य:स्थितीत राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल शासनास सादर करुनही शासनाकडून वेगवेगळ्या समित्यांची नियुक्ती करुन निर्णयाबाबत चालढकल करण्यात येणे, तृतीय अधिवेशन २०१२ दरम्यान उद्योग मंत्री यांची एकसदस्यीय समिती नियुक्त करुन एका महिन्यात मराठा समाजास आरक्षण देण्याची केलेली घोषणा, सदर आश्वासनाचे पालन न झाल्यामुळे राज्यातील मराठा समाजात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **(शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**सर्वश्री. विनायकराव मेटे,** राजेंद्र जैन, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. किरण पावसकर**,** सुभाष चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बीड येथील (जि.बीड) आदित्य पॉलिटेक्नीक व मिठ्ठुलालजी सारडा पॉलिटेक्नीक महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ८०० असणे, यात मागासवर्गीय व अल्पसंख्याक

विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दाखविण्यात येणे, या विद्यार्थ्यांना केंद्र शासनामार्फत शिष्यवृत्ती मिळत असणे, परंतु या दोन्ही महाविद्यालयात बनावट मागासवर्गीय दाखवून त्यांच्या नावावर केंद्र शासनाकडून मिळालेल्या करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत असणे, वास्तविक पाहता ८० ते ९० टक्के विद्यार्थी परिक्षेला बसणे आवश्यक असताना फक्त १६ ते १७ टक्के विद्यार्थीच परिक्षेला बसणे, या दोन्ही महाविद्यालयांविरुध्द बऱ्याच तक्रारी असणे, मागासवर्गीय अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भ्रष्टाचार करणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री धनंजय मुंडे,** अमरसिंह पंडित **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील संगम व १८ खेडी पाणीपुरवठा योजना गेल्या ७ वर्षापासून बंद असणे, या योजनेवर आतापर्यंत १३ कोटी ७७ लाख रुपये खर्च होऊन ही योजना केवळ दोनच वर्षे सुरु राहणे, ७ वर्षापासून योजना बंद असल्यामुळे योजनेवर अवलंबून असणाऱ्या १८ गावांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत असणे, योजनेमध्ये समाविष्ट असलेली गावे परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील असून या योजनेचे शुध्द पाणी मिळत नसल्याने या गावातील नागरिकांना औष्णिक विद्युत केंद्राच्या राखेच्या प्रदुषणामुळे प्रदुषित झालेले विहिरीतील पाणी प्यावे लागणे, त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येणे, ही योजना सुरु व्हावी याकरीता नागरिकांकडून वारंवार मागणी होत असणे, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. संजय दत्त,** प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. चरणसिंग सप्रा, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री. सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री. विक्रम काळे, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, ॲड. जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री. धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, नितीन गडकरी, राणा जगजितसिंह पाटील, रमेश शेंडगे, प्रकाश बिनसाळे, दिपकराव साळुंखे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. विजय गिरकर, मोहन जोशी **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण निधी अभावी रखडणे, क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतुकीचे वाढते प्रमाण, मागील सहा वर्षात १६०० जणांचा झालेला मृत्यू, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दिनांक २३ डिसेंबर, २०१२ रोजी अपघातात अभिनेते आनंद अभ्यंकर व अक्षय पेंडसे यांचा झालेला मृत्यू, सन २०१२ या वर्षात झालेल्या एकूण ३३ अपघातांमध्ये २१ जणांचा झालेला मृत्यू, ६० जण जखमी होणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास जि.सोलापूर येथील जुनोनी व मुळेगाव तांडाजवळ माघीवारीसाठी निघालेल्या दिंडीत कार घुसून झालेल्या अपघातात ७ वारकऱ्यांचा झालेला मृत्यू, १७ वारकरी गंभीर जखमी होणे, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्याजवळ पिकअप व्हॅन व कंटेनर यांची धडक होऊन १४ भाविकांचा झालेला मृत्यू, ७ भाविक गंभीर जखमी होणे, कळंब तालुक्यातील उपळाई येथील भाविकांच्या गाडीला झालेल्या अपघातात १४ भाविकांचा झालेला मृत्यू, अपघात टाळण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याचे रखडलेले चौपदरीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याची आवश्यकता, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाढत्या अपघाताच्या पार्श्वभुमीवर या रस्त्याचे सुरक्षाविषयक ऑडिट करुन रस्त्याच्या रचनेमधील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता, रात्रीच्यावेळी पोलीसांची गस्त वाढविण्याची गरज, राज्यात विविध ठिकाणी घडलेल्या अपघाताची सखोल चौकशी करुन मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या व जखमीच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. किसनचंद तनवाणी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात अल्पसंख्याकबहूल शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता दरवर्षी २ लाखांचे अनुदान देण्यात येणे, याकरिता शाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ७० टक्के विद्यार्थी अल्पसंख्याक असणे, बंधनकारक असतांनाही औरंगाबाद जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात नियमांचा भंग करत अपंग शाळांना अल्पसंख्याकबहुल दाखवून लाखो रुपयांचे अनुदान वाटप करण्याची शिफारस करण्यात आल्याचे नुकतेच उघडकीस येणे, तसेच गटशिक्षणाधिकाऱ्यांचा दाखला न घेताच सदरहू अनुदानाचे वाटप करण्यात येणे, याबाबत वारंवार संबधितांकडे तक्रार करण्यात येऊन त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन

संबधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(६) **सर्वश्री. सतीश चव्हाण,** विक्रम काळे, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, धनंजय मुंडे, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, नरेंद्र पाटील, निरंजन डावखरे, राणा जगजितसिंह पाटील, दिपकराव साळुंखे, संदिप बाजोरिया, हेमंत टकले, अनिल भोसले, नितीन गडकरी, नागो गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शासनाने जीवनदायी आरोग्य योजनेचे नाव बदलून "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना" असे करणे, या योजनेमध्ये बहूतांश आजारासाठी निश्चित केलेले दर हे बाजार भावापेक्षा फारच कमी असणे, अॅन्जीओप्लास्टीसाठी फक्त रु.६०,०००/- निश्चित केलेले असणे, मात्र यासाठी लागणाऱ्या स्टेंट ची किंमत रु.१,०५,०००/- असणे, परंतू शासकीय दर कमी असल्याने बहूतांश रुग्णांना उपचार घेते वेळेस कमी दर्जाचा स्टेंट वापरावा लागणे, याच बाबतीत केंद्र शासनाने निश्चित केलेला दर हा रु.१,२७,६५०/- असून त्या व्यतिरिक्त दवाखाना, डॉक्टर, ऑपरेशन व औषधी व तपासण्याचा खर्च वेगळा असणे, याचप्रमाणे सर्व सामान्य गोरगरीब रुग्णांना चांगल्या प्रकारचे उपचार देणेसाठी या योजनेतील सर्वच दरपत्रकात सुधारीत वाढ करुन देणे गरजेचे असणे, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. नागो गाणार,** नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात एकूण आठ अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये महाराष्ट्र राज्य विद्यापीठे अधिनियम, १९९४ व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांप्रमाणे कार्यरत असणे, ह्या शरीरिक महाविद्यालयांमध्ये सुमारे १५० ते २०० प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असून ह्या सर्व शारीरिक महाविद्यालयांना शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण या विभागामार्फत वेतन अनुदान दिले जाणे, परंतू ३-३ महिन्यानंतर वेतन दिले जाणे, ह्या प्राध्यापकांना व कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोग सन २००६ पासून लागू न करता सन २०११ पासून लागू करणे, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, ही महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली देण्याची केलेली मागणी, या महत्त्वाच्या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून घ्यावयाचा निर्णय, करावयाची कार्यवाही व

शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : विशेष उल्लेख (असल्यास)- (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये).**

# - मध्यंतर -

**सात : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम २२८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीची तरतूद स्थगित करण्यात यावी."

**आठ : सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस).**

**नऊ : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**दहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी)**

**(१) डॉ. नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासनाने या शालेय बसगाड्यांकरिता नियमावली तयार केली असून या नियमावलीच्या विरोधात "स्कूल बस ओनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र" या शाळा बस मालकांच्या संघटनेने उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात येणे, यावर न्यायालयात तीन-चार वेळा सुनावण्या झाल्या त्यावेळी न्यायालयाने शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षा अत्यंत महत्वाची असून त्यात कुठलीही तडजोड करता येणार नाही, असे नमूद करुन सुधारित नियमावलीला स्थगिती देण्यास मागच्या सुनावणीस नकार देणे, या नियमावलीच्या अंमलबजावणीला न्यायालयाने स्थगिती दिलेली नसली तरी प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने सदर नियमावली ना आरटीओ अधिकारी गांभीर्याने राबवित आहेत, ना बस चालक त्याला महत्व

देत असणे, शिक्षण हक्क कायद्यात एक किलोमीटरच्या अंतरामध्ये राहणाऱ्या मुलांना प्रवेश देताना प्राधान्य दिले जावे अशी तरतूद असणे, परिवहन खात्याने बसचालक व मदतनीस यांना सुयोग्य अभ्यासक्रम बनवून त्यांचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता, त्याचबरोबर सदर प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय शाळाबस कंत्राटदाराने नोकरी देऊ नये असे बंधनकारक करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड. आशिष शेलार व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई महानगर हे महिलांसाठी सर्वात सुरक्षित असल्याचा दावा वारंवार शासनातर्फे करण्यात येणे, प्रत्यक्षात मात्र महिलांवरील अत्याचारात सातत्याने वाढ होत असल्याचे उघड होणे, मुंबईत रोज सरासरी एका महिलेवर बलात्कार होणे किंवा एका महिलेचे अपहरण होण्याची घटना घडत असल्याचे आढळून येणे, तसेच महिला छेडछाडीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कायद्यात आवश्यक तो बदल करुन हा गुन्हा अजामीनपात्र करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करा असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले असणे, महिलांवरील अत्याचार रोखण्यासंदर्भात प्रचलित कायद्यातील तरतुदीचा अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.